२५ वर्षे विश्वासाचे

follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ※ वर्ष २५ ※ अंक २८९ सातारा ※ शुक्रवार दि. ५ जुलै २०२४ ※ पाने ८ ※ किंमत ५ रू/

# राज्यात आता लाडका शेतकरी योजना लागू करा

## संजय राऊतांची मागणी, सरकारवर केली टीका



**मुंबई :** राज्यातील महाविकास आघाडीचे नेते शेतकरी मुद्द्यांवरून महायुती सरकारवर टीका करताना दिसत आहेत. राज्यातील शेतकरी आत्महत्या, पीकविमा कंपन्यांकडून केली जाणारी लूट यांवरून विरोधक सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधत आहेत. यातच आता मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली आहे. हा धागा पकडून संजय राऊत यांनी राज्यात लाडका शेतकरी योजना लागू करा, अशी मागणी करत राज्य सरकारवर टीका केली आहे.

महाराष्ट्र सरकारने माझी लाडकी बहीण योजना आणली आहे. आता सरकारने माझा लाडका शेतकरी योजनाही आणावी. महाराष्ट्रात रोज १० शेतकरी महाराष्ट्रात आत्महत्या करत आहेत. जानेवारी महिन्यात राज्यात ३५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. अमरावती जिल्ह्यात सर्वाधिक आत्महत्या होताना दिसत आहेत. यावर राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी अद्याप भाष्य केलेले नाही. तुम्ही लाडकी बहीण योजना आणली, पण त्या बहिणीचा लाडका भाऊ आत्महत्या करत आहे. राज्यामध्ये यामुळे दुःखाचे सावट निर्माण झाले आहे, या शब्दांत संजय राऊत यांनी हल्लाबोल केला.

पीकविमा धोरण बदलून शेतकरी हिताचे धोरण बनवा

राज्यात मराठवाड्यासह विविध भागात दुष्काळ आहे, शेतकरी संकटात आहे असे असताना शेतकऱ्याला मदत मिळत नाही तर दुसरीकडे पिकविमा कंपन्या शेतकऱ्यांच्या जीवावर खिसे भरत आहेत. राज्यातील सरकार पीक विमा कंपन्यांबरोबर आहे, मोदींच्या मित्रोंबरोबर आहे. महसूल विभागाची वेबसाईट आजही बंद आहे, या बेवसाईटवर नोंद झाली नाही तर पीक विमा मिळत नाही. शेतकऱ्यांची लूट करणारे हे पीकविमा धोरण बदलून शेतकरी हिताचे धोरण बनवा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

दरम्यान, शेतकरी दुष्काळाचा सामना करत असतानाही शेतकऱ्यांना पिक विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळत नाही. सरकार ऐकायला तयार नाही. महाराष्ट्रात रोज ४ शेतकरी आत्महत्या होत आहेत, अधिवेशन काळातही या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. शेतकरी जगला तर देश जगेल म्हणूनच संकटातील शेतकऱ्याला आधार देण्यासाठी सरसकट कर्ज माफी जाहीर करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. पण या सरकारला शेतकऱ्यांचे हित साधायचे नाही, भाजपाप्रणित शिंदे सरकार हे शेतकरी विरोधी आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

# पुसेसावळी दंगलीतील पिडीत मुस्लिम समाजाचे दि.८ पासून आमरण उपोषण




**सातारा :** पुसेसावळी दंगलीच्या दहा महिन्या नंतर ही निरपारधी होतकरू इंजिनियर मुस्लिम तरुणाच्या हत्याकांडास जबाबदार असणाऱ्या बहुतांश दंगलखोरांना आजपर्यंत अटक झाली नाही. प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत असून फरारी आरोपींना तात्काळ अटक करावी अन्यथा दि. ८ जुलै पासून सातारा जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषणाचे निवेदन पुसेसावळी मुस्लिम समाजाने खटावच्या प्रांताधिकारी उज्वला गाडेकर, तहसीलदार बाई माने उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग, वडूज यांना दिले.

संपूर्ण महाराष्ट्राला काळिमा फासणारी पूर्वनियोजित षडयंत्र रचून पुसेसावळीत (ता. खटाव) येथे १० सप्टेंबर २०२३ रोजी दंगल झाली. प्रार्थनास्थळावर झालेल्या हल्ल्यामध्ये निरपारधी होतकरू नुरुलहसन शिकलगार या इंजिनियर मुस्लिम तरुणाची हत्या करण्यात आली.काही जातीयवादी संघटनांच्या वतीने झालेल्या हल्ल्यात धार्मिक स्थळ, धर्मग्रंथ,निवासी संकुल, वाहने, व्यापार संकुलाची तोडफोड व जाळपोळ करण्यात आली. तसेच दहा ते पंधरा जणांना गंभीररित्या जखमी करण्यात आले.

याबाबत मुस्लिम समाजाला अद्याप संपूर्णपणे न्याय मिळालेला नाही तसेच सदर घटनेत मृताच्या कुटुंबियांना जखमींना, नुकसानग्रस्त पीडित गरीब मुस्लिम समाजाला आजपर्यंत कोणतीही सरकारी मदत मिळालेली नाही.समाज माध्यमावर प्रतिक्रिया केल्याचे मात्र छायाचित्र दाखवून गुन्हे दाखल केल्यानंतर खोट्या आरोपामुळे नाहक तीन मुस्लिम तरुणांचे आयुष्य बरबाद झाले आहे. त्यामुळे आम्ही समस्त मुस्लिम बांधव सोमवार दि ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता सातारा जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण करीत आहोत.

# अक्कलकोटमध्ये श्री स्वामी समर्थ अनूनछत्र मंडळ ६५ कोटी खर्चाचे नवीन महाप्रसादगृह उभारणार

## फडणवीस यांच्या हस्ते होणार भूमिपूजन



**सोलापूर :** देशभर नावारूपास आलेल्या अक्कलकोटच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने आपल्या सेवाकार्याचा विस्तार करीत सुमारे ६५ कोटी रूपये खर्च करून पाच मजली देखणे महाप्रसादगृह उभारण्याचा संकल्प सोडला आहे. संपूर्णतः वातानुकूलित असलेल्या या महाप्रसादगृहात एकाचवेळी अडीच हजार भाविकांना महाप्रसादाचा लाभ घेता येईल. तर पाच हजार भाविकांसाठी आधुनिक सुविधांसह प्रतीक्षालय उभारले जाणार आहे.

अक्कलकोट नगरीच्या सौंदर्यात भर टाकणा-या या नव्या महाप्रसादगृहाचे भूमिपूजन येत्या २१ जुलै रोजी, गुरूपौर्णिमेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. याबाबतची माहिती श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी दिली.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाची स्थापना १९८८ साली गुरूपौर्णिमेच्या दिवशी जन्मेंजयराजे भोसले यांनी केली होती. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली संस्थेचे रूपांतर वटवृक्षात झाले आहे. दररोज हजारो भाविकांना महाप्रसाद देण्यासह पाच हजार भाविकांसाठी यात्री निवास आदी सुविधा कार्यरत आहेत. वटवृक्ष श्री स्वामी महाराज मंदिरालगत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने भाविकांकडून मिळणा-या देणग्यांच्या बळावर उत्तरोत्तर सेवा विस्तार केला आहे. अन्नछत्र मंडळाच्या परिसरात शिवस्मारक, उद्यान, वाटिका कार्यरत आहेत. दरवर्षी गुरूपौर्णिमेच्या पर्वावर धार्मिक व सांस्कृतिक संकीर्तन महोत्सवासह वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. केवळ भाविकांपुरतेच नव्हे तर राज्यात व देशात ज्या ज्यावेळी भूकंप, वादळ, महापूर यासारखी नैसर्गिक संकटे कोसळली, त्यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने मदतीचा हातभार लावला आहे. अक्कलकोट परिसरातील आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबांना दररोज दोनशे जेवणाचे डबे सन्मानाने पोच केले जातात. नवोदित पैलवानांना प्रोत्साहन देण्यासाठी दररोज खुराकही दिला जातो. संस्थेने गोव्यातही पाच एकर जमीन खरेदी करून तेथेही सेवाकार्य हाती घेतले आहे.

अक्कलकोटमध्ये भाविकांचा ओघ वाढू लागल्यामुळे काळाची गरज ओळखून संस्थेने एक लाख १९ हजार ३९८ चौरस फूट आकाराचे भव्य पाच मजली महाप्रसादगृहाची उभारणी हाती घेतली आहे. त्यासाठी आवश्यक कायदेशीर परवानगी प्रक्रिया पूर्ण केल्याचे अमोलराजे भोसले यांनी सांगितले. या नियोजित वातानुकूलित महाप्रसादगृहाच्या वास्तुमध्ये तळमजल्यात धान्य व भाजीपाला कोठार, मिरची कांडण व पिठाची गिरणी, एका तासात ८०० चपात्या तयार करण्याची यंत्रसामुग्री, भांडी धुण्याचे डिश वाशर यंत्रणा आदी सुविधा राहणार आहे. एकूण १२१ फूट उंच असलेल्या या भव्य वास्तुच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थ महाराजांची ५१ फुटी उंच बैठी मूर्ती उभारली जाणार आहे. हा संपूर्ण प्रकल्प भाविकांच्या देणग्यांतून उभारला जात असल्याचे अमोलराजे भोसले यांनी सांगितले. अन्नछत्र मंडळाच्या परिसराजवळ तीन एकर जमीन खरेदी करण्यात आली आहे. तेथे वाहनतळाची सोय विस्तारली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविम्याची ११५ कोटींची भरपाई, पाच वर्षांतील सर्वात मोठी रक्कम

**सातारा :** जिल्ह्यात गेल्यावर्षी पर्जन्यमान कमी झाले होते. त्यामुळे खरीप हंगामाला फटका बसला होता. यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील सुमारे सवा दोन लाख शेतकऱ्यांना ११५ कोटी रुपयांची भरपाई मिळाली आहे. हे पैसे संबंधितांच्या बँक खात्यावरही वर्ग झालेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळालेला आहे.

शेतकऱ्यांना शेती करताना विविध संकटांचा सामना करावा लागतो. यासाठी पीक विमा योजना सुरू करण्यात आलेली आहे. यामध्ये अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, पावसातील खंड, ढगफुटी, चक्रीवादळ आदी कारणाने पिकांचे नुकसान झाल्यास विमा उतरविलेल्या पिकांसाठी भरपाई देण्यात येते. यासाठी पूर्वी शेतकऱ्यांना ठराविक रक्कम भरावी लागत होती. तर राज्य आणि केंद्र शासन बाकीचा भार उचलत होते. मात्र, गेल्यावर्षीपासून राज्य शासनाने शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजना सुरू केली. शेतकरीएक रुपया भरुन योजनेत समाविष्ट होत आहेत. त्यामुळे गेल्यावर्षी खरीप हंगामात एक रुपयाची योजना सुरू झाल्यानंतर सातारा जिल्ह्यातील पावणे तीन लाखांहून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता.-
ऊतएठढखडएचएछढजिल्ह्यात गेल्यावर्षी पर्जन्यमान कमी झाले होते. पावसाच्या वार्षिक सरासरीनेही १०० टक्क्यांचा पल्ला गाठला नव्हता. तसेच सर्वच तालुक्यात पाऊस कमी होता. यामुळे खरीप हंगामातील पिकांना फटका बसलेला. त्यामुळे पंतप्रधान पीक विमा योजनेत सहभाग घेतलेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळत आहे. जिल्ह्यातील २ लाख २७ हजार शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर पीक नुकसान भरपाईपोटी ११५ कोटी रुपये जमा झाले आहेत. विविध पिकांच्या नुकसानीसाठी ही भरपाई रक्कम देण्यात आलेली आहे. त्यामुळे पीक विमा योजनेचा जिल्ह्यातील सवा दोन लाखाहून अधिक शेतकऱ्यांना मोठा फायदा झाल्याचे दिसून येत आहे.पाच वर्षांतील सर्वात मोठी भरपाई रक्कम..

**गेल्यावर्षी खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. गेल्यावर्षीच्या पीक नुकसानभरपाई अंतर्गत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर ११५ कोटी रुपये वर्ग झाले आहेत. यावर्षीही शेतकऱ्यांनी या योजनेत १५ जुलैपूर्वी सहभाग घ्यावा.**

**- भाग्यश्री फरांदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. यामध्ये २०२३ मधील खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीपोटी मिळालेली रक्कम सर्वाधिक आहे. २०१९-२० वर्षात ७४ हजार १४०शेतकरीयोजनेत सहभागी झाले होते. त्यावेळी नुकसानीसाठी ७ कोटी ६१ लाख रुपये हे ३१ हजार ५५७ शेतकऱ्यांना मिळालेले. २०२०-२१ मध्ये २४७ शेतकऱ्यांना ६ लाख रुपये मिळाले होते. तर २०२१-२२ वर्षात १६६ शेतकऱ्यांना ५ लाख तर २०२२-२३ वर्षात ४९४ शेतकऱ्यांना ९ लाखांची भरपाई मिळालेली. २०२३ च्या खरीप हंगामात २ लाख ७६ हजार शेतकरी विमाधारक होते. त्यातील २ लाख २७ हजार शेतकऱ्यांना ११५ कोटी मिळालेले आहेत. निसर्गाचा लहरीपणा वारंवार अनुभवास येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत होणाऱ्या नुकसानीसाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभाग घ्यावा. यासाठी एक रुपया भरावा लागणार आहे.

# अंबादास दानवेंचा निलंबन कालावधी तीन दिवसांवर

**मुंबई :** शिविगाळ केल्याप्रकरणी पाच दिवसांसाठी निलंबित झालेल्या विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या निलंबनाचा कालावधी तीन दिवसांपर्यंत कमी करण्याचा ठराव गुरुवारी विधान परिषदेत एकमतांने मंजूर करण्यात आला. दानवे यांनी उपसभापतींना पत्र देऊन दिलगिरी व्यक्त केल्यानंतर निलंबन मागे घेण्यात आले. दानवेंना यामुळे दिलासा मिळाला असून उद्यापासून सभागृहात ते हजेरी लावणार आहेत. दरम्यान, कमी दिवसात ट्वेण्टी ट्वेण्टी मॅच खेळू असे म्हणत त्यांनी सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेणार असल्याचे सूचक इशारा दिले.

भाजप आमदार प्रसाद लाड यांना शिविगाळ प्रकरणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना पाच दिवसांसाठी निलंबित केले होते. निलंबनाच्या कालावधीत विधानभवनात त्यांना बंदी घातली होती. यासंदर्भात अंबादास दानवे यांनी ३ जुलै रोजीच्या पत्रात सभागृह प्रति दिलगिरी व्यक्त केली. दानवे यांच्या निवेदनाची दखल घेत, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी विधान परिषदेत निलंबनाचा कालावधी पाच दिवसांऐवजी ३ दिवसांचा करण्याचा प्रस्ताव मांडला. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी हा ठराव सभागृहासमोर ठेवल्यानंतर सर्वांनी एकमताने मंजूर केला. त्यामुळे आता अंबादास दानवे यांना दिलासा मिळाला असून ते शुक्रवारी सभागृहात उपस्थित राहणार आहेत.

निलंबन मागे घेतल्याबाबत दानवे यांनी सभापतींचे आभार मानले. उपसभापतींनी फार काही न्याय दिला, असे सांगत आपली नाराजी व्यक्त केली. आठवड्यातील तीन दिवस संपले असे तरी शेवटचा एक दिवस मिळणार आहे. काही हरकत नाही, टेस्ट मॅच खेळतो, तसाच एका दिवसांच्या टी-२० प्रमाणे मॅच ही खेळू शकतो, असा सूचक संकेत दिले.

# मनोज जरांगे -पाटील यांच्या वाहन ताफ्याच्या सुरक्षेसाठी सशस्त्र पोलीस नियुक्त : मंत्री शंभूराज देसाई



**मुंबई :** मनोज जरांगे-पाटील यांच्या सुरक्षेसाठी एक अधिक एक सशस्त्र पोलीस अंमलदार नेमण्यात आले आहेत. तसेच त्यांच्या वाहन ताफा सुरक्षेसाठी एक अधिक तीन सशस्त्र पोलीस अंमलदार नेमण्यात आले आहेत, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधानसभेत निवेदनाद्वारे दिली.

जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात ड्रोनद्वारे सर्वेक्षण होत असल्याचे समजताच स्थानिक पोलीस पथक आंतरवाली येथे गेले. तेथील शिवारात पाहणी केली असता पोलीस पथकास ड्रोन आढळून आले नाहीत. तथापि, याबाबत संशयास्पद वाटणाऱ्या बाबींची चौकशी करण्यासाठी तीन स्वतंत्र पथके पोलीस अधीक्षकांनी तयार केली असून चौकशी सुरू आहे, अशी माहिती मंत्री देसाई यांनी दिली. मंगळवारी ३ जुलै रोजी विधानसभेतील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आंतरवाली सराटी (जि. जालना) येथे ड्रोनद्वारे सर्वेक्षण केले जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात सविस्तर अहवाल जिल्हा पोलीस प्रशासनाकडून प्राप्त करून त्याबाबत सभागृहास अवगत करण्यात येईल, असे मंत्री देसाई यांनी सभागृहास आश्वस्त केले होते. त्यानुसार आज विधानसभेत सदर प्रकरणी मंत्री देसाई यांनी माहिती दिली.

# मराठा आरक्षण आंदोलन भरकटले : नरेंद्र पाटील

**धाराशिव :** मराठा आरक्षणाच्या आंदोलनात राजकारण आले. त्याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत दिसून आला. राज्य सरकारने कुणबी नोंदी शोधून काढल्या, प्रमाणपत्रे दिली. सरकार सकारात्मकतेने आरक्षण देत असताना अनपेक्षितपणे पुन्हा सरकारवरच टीका करायचे हे न पटणारे आहे. त्यामुळे आंदोलन भरकटले आहे. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याच्या बाबतीतही सरकार तोडगा काढत आहे, त्यामुळे सरकारला वेठीस धरणे योग्य नाही, असे मत आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र पाटील यांनी व्यक्त केले.

धाराशिव येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या नियोजन भवन येथे आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या कार्याचा नरेंद्र पाटील यांनी आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, सरकारने आरक्षणाच्या अनुषंगाने जाहीर केलेल्या बाबींचा एकीकडे लाभ घ्यायचा आणि दुसरीकडे सरकारच्या विरोधात मोर्चेबांधणी करायची. त्यामुळे साहजिकच आहे, सरकार थोडेसे अंतर देवून काम करणार. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार सकारात्मक आहेत. भरपूरजन याचिकाकर्ते आहेत. त्यामुळे साकल्याने विचार करणे गरजेचे आहे. महाराष्ट्र सरकारने सर्वेक्षण करून कुणबी नोंद असलेल्यांना प्रमाणपत्रे वाटप केली. त्यामुळे ते आता ओबीसी आरक्षणास पात्र आहेत.

उर्वरित मराठा समाजबांधवांच्या आरक्षणासाठी सरकार प्रयत्नशील आहे. अनेकांनी आक्षेप दाखल केले आहेत. अनेकांच्या याचिका दाखल आहेत. त्या सर्व नियमानुकूल करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. जाळपोळ करून शासकीय मालमत्तेचे नुकसान करणे, असे बहुतांश गुन्हे सरकारने मागे घेतली आहेत. अनेक ठिकाणी झालेल्या आंदोलनातील गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. मात्र जे गंभीर स्वरूपाचे गुन्हे आहेत,

त्याबद्दल अद्याप निकाल देण्यात आलेला नाही. सरकार त्याबाबत गांभीर्याने विचार करत आहे. सरकारी मालमत्तेचे नुकसान आपण मोठ्या प्रमाणात करत असू, तर सरकार नुकसानीत आल्याशिवाय राहणार नाही, हे आपण लक्षात घ्यायला हवे. आमदारांची घरे जाळणारांना जर मुक्त करायला लागलो तर भविष्यात अन्य आमदारांची घरे जाळली जातील. चालत्या गाड्या पेटवून दिल्या जातील. त्यामुळे लोकांनी आंदोलन करताना इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी, असेही माजी आमदार पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

# खरंच गंगेत घोडं न्हाणार का ?

विषय अर्थातच किसनवीर सहकारी साखर कारखाना भुईंज व खंडाळा. नुकतीच दोन्ही कारखान्यांना अनुक्रमे ३५० व १५० अशी ५०० कोटी व दुष्काळ निधी ४४ कोटी मंजूर जाहीर झाल्याची माहिती कारखाना व्यवस्थापनाने प्रसिद्ध केली. ही मदत कोणामुळे मिळाली, कोणी खेचून आणली इ. इ.चर्चांना जिल्ह्यात ऊत आलाय, कशामुळे मदत मिळाली, अचानक सरकारला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांविषयी, महिलांविषयी कळवळा कसा काय आला. जे सत्ताधारी आहेत त्यांना श्रेय घेण्याचा अधिकार आहे. सरकार विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर खाडकन जागं झालं याचं गुपित महाराष्ट्रात होऊन गेलेल्या लोकसभा निवडणुकीत आहे, महाराष्ट्रातील मतदारांनी भाजपप्रणित महायुतीच्या पेकाटात जो काय दणका दिला आहे त्याचीच परिणीती वरील मदतीत दिसते हे खरं आहे, लोकसभा निकालानंतर एक फुल दोन हाफ सरकारच्या चेहऱ्याचा रंग उडाला, अलीकडेच श्री जयंत पाटलांनी म्हटले आहे चादर लगी फटणे तो खैरात लगी बटणे. ते काही जरी असलं तरी दोन्ही कारखान्यांना मिळणारी मदत ही स्वागतार्ह आहे त्यामुळे किसनवीर कारखान्याचा कोंडलेला श्वास मोकळा होण्यास मदत होणार आहे. कारखाना खाजगीकरणाकडे झुकणाऱ्या प्रकरणाला एकप्रकारे चाप लागला ही कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हिताची बाब आहे. श्रेयवादासाठी वाई तालुक्यातील नेत्यांवर प्रेम करणाऱ्या अनुयायांकडून फारसा प्रतिसाद प्रसिद्धी माध्यमांमध्ये दिसला नाही, गेल्या १७-१८ वर्षात आजी-माजी कारभाऱ्यांचा कारभार जनतेसमोर उघडा झाला, एकमेकांवरील आरोपांमुळे बरीचशी माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचली, कारखान्याच्या दुरावस्थेला दोघेही कसे जबाबदार आहे याची पोलखोल झाली त्यामुळे नेत्यांवर प्रेम करणाऱ्या भक्तांच्यात शांतता आहे,नाहीतर एरवी मुठभर कामाचा दुनियाभर बाजार मांडणारे समर्थक शांत बसले नसते. किसनवीर कारखान्यावर जवळजवळ १०० कोटींचं कर्ज असल्याचे सत्ताधाऱ्यांनी अनेक वेळा सांगितलेलं आहे कारखान्यावर विविध प्रकारच्या ९ बँकांची कर्ज आहेत. जढड योजनेमार्फत सर्व बँकांची खाती निरंक करून घेणार, कारखान्याची सर्व संपत्ती राज्य सहकारी बँकेकडे तारण राहणार, दुसऱ्या बँका परत कर्ज देणार नाहीत त्यात ५४ कोटी रुपयांचे शेतकरी थकीत ऊस बिल, कामगारांचे पगार या सर्वातून किती शिल्लक राहणार हा एक संशोधनाचा विषय आहे. प्रथमतः शेतकऱ्यांची थकीत ऊस बिलं, कामगारांचा थकीत पगार व्याजासह मिळणे गरजेचे आहे अन्यथा पहिले पाढे ५५ या सदरात हे प्रकरण जाईल त्यासाठी शेतकरी वर्गाने आग्रह धरणे गरजेचे आहे, शासन दरबारी तशी मागणी करणं गरजेचं आहे नाहीतर शेतकऱ्यांच्या खिशात हात घालायला सरावलेले कारभारी पहिल्या बँकांच्या कर्जफेडीचे कारण देऊन शेतकरी व कामगारांना पुन्हा वाऱ्यावर सोडण्याची शक्यता नाकारता येत नाही. श्री मदन भोसले यांच्या कार्यकाळात कारखाना अडचणीत यावा म्हणून बँकांकडून, शासनाकडून मदत मिळू नये यासाठी पाटील बंधूंनी अडथळे निर्माण करत असल्याचे आरोप तात्कालीन व्यवस्थापनाकडून वारंवार झालेले आहेत, सत्ताबदल झाल्यानंतर श्री भोसलेंनी तशा प्रकारची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला नसावा, तुम्ही गाय मारली आता मी वासरू मारणार असा करंटेपणा श्री मदन भोसले यांनी दाखवला नाही अर्थात एक प्रकारे कारखान्याला मदतच केल्याचे प्रथमदर्शनी दिसते. आजी-माजी अध्यक्षांनी असेच गुण्यागोविंदाने राहावे म्हणजे कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना सुगीचे दिवस येतील अशीच कारखाना कार्यक्षेत्राची जनभावना आहे, येवी-तेवी दोघेही महायुतीमध्ये एकत्र आहेतच. कारखान्याच्या दुरावस्थेला पाटील व भोसले दोघेही तेवढेच जबाबदार आहेत, मागील ५-७ वर्षात शेतकऱ्यांना जो त्रास सहन करावा लागला तो या मदतीच्या कित्येक पट अधिक आहे, तो भरून काढायची जबाबदारी यांचीच आहे त्यामुळे श्रेयवादासाठी कोणीही ऊर बडवायची गरज नाही. तालुक्यात कारखान्याव्यतिरिक्त अनेक प्रश्न कित्येक वर्षे तसेच प्रलंबित आहेत. तालुक्यातील पाण्याची कवठे केंजळ योजना, पश्चिम भागातील जललक्ष्मी योजना, पर्यटन, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात कमालीची दुरावस्था आहे, मग सलग पंधरा वर्षात तालुक्याचे आमदार श्री मकरंद पाटलांनी नक्की काय काम केलं हा प्रश्न कार्यक्षेत्रातील शेतकरी विचारताना दिसतात ही वस्तुस्थिती आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अधिवेशनात सरकारने वारेमाप योजना जाहीर करून ठेवल्यात, शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार सहाय्य, शेतीपंप विज बिल पूर्ण माफी, दुष्काळ मदत, शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा, अन्नपूर्णा योजना, शुभमंगल योजना, महिलांना पिंक रिक्षा, लखपती दीदी त्यात कारखान्यांना थकहमी आहेच ह्या सर्व योजना व्यवहारी आहेत का हे पाहण्यासाठी समिती स्थापन होणार त्यानंतर अंमलबजावणी होणार त्यामुळे तज्ञांकडून याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. ही मदत खरच मिळणार आहे का अन्यथा गाजराची पुंगी वाजली तर ठीक नाहीतर मोडून खाल्ली. किसनवीर कारखान्याला प्रत्यक्ष मदत तात्काळ मिळेल अशी अपेक्षा करूयात त्यातला त्यात प्राधान्याने शेतकऱ्यांची मागील व चालू थकीत ऊस बिलं व कामगारांचे पगार व्याजासकट मिळावेत म्हणजे कार्यक्षेत्रातील शेतकरी व कामगार भरून पावेल, तेव्हा कुठे खऱ्याअर्थाने गंगेत घोडं न्हालं म्हणावं लागेल.

**- कल्याण पिसाळ देशमुख**

# बहीण माझी लाडकी योजनेसाठी शासन आपल्या दारी

## पात्र महिला लाभार्थींची घरीच होणार नोंदणी



**जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची माहिती**

**सातारा :** बहिण माझी लाडकी या योजनेचे नियम अत्यंत सुटसुटीत व लवचिक करण्यात आले असून सातारा जिल्ह्याच्या आठ लाख कुटुंबातील पात्र महिलांनी नोंदणीसाठी कोठेही जाण्याची गरज नाही. तलाठी, अंगणवाडी सेविका, आशासेविका व तत्सम कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांची नारीशक्तीदूत मोबाईल पद्वारे घरीच नोंदणी करण्यात येणार आहे . गावोगावी हे नोंदणी अभियान राबविले जाणार असून या योजनेच्या माध्यमातून सर्व पात्र महिला लाभार्थींना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन उपस्थित होत्या.

डुडी पुढे म्हणाले , सातारा जिल्ह्याची लोकसंख्या तीस लाख असून यामध्ये आठ लाख कुटुंबे आहेत .दर ५० कुटुंबा मागे एक पथक असे प्रमाण गृहीत धरून पात्र लाभार्थी महिलांना लाडकी बहीण योजनेचे लाभ दिले जाणार आहेत .या योजनेसाठी २१ ते ६५ वयोगटातील महिला पात्र आहेत .सातारा जिल्ह्यातील तलाठी अंगणवाडी सेविका आशाताई वर्कर महिला बचत गटाचे अध्यक्ष इत्यादी यंत्रणाच्या माध्यमातून ही नोंदणी केली जाणार आहे . राज्य शासनाने या योजनेच्या अटी शर्ती शिथिल केल्या आहेत अधिवास प्रमाणपत्रासाठी प्रत्यक्ष प्रमाणपत्रापेक्षा पंधरा वर्षाचे रेशन कार्ड असेल तर चालू शकते याशिवाय आधार कार्ड तसेच पिवळे व केशरी रंगाचे रेशन कार्ड असेल तर अधिवास प्रमाणपत्राची गरज राहणार नाही ज्यांचे पांढरे रेशन कार्ड आहे त्यांना फक्त उत्पन्नाच्या दाखल्याची अट राहणार आहे.

महिलांनी या योजनेच्या नोंदणीसाठी कोणत्याही कार्यालयात जाण्याची गरज नाही .महसूल यंत्रणेचे पथक आपल्या घरी पोहोचणार असून नारीशक्तीदूत या मोबाईल प द्वारे नोंदणी केली जाणार आहे यामध्ये महिलेचे नाव महिलेचे वय पत्ता गावाचे नाव आणि आवश्यक कागदपत्रे मोबाइल ॲप वर अपलोड करावयाची आहेत . ही अत्यंत सोपी आणि सुटसुटीत प्रक्रिया आहे . महसूल यंत्रणा या नोंदणी कामात सक्रीय राहणार असून जिल्ह्यात घरोघरी पात्र महिलांच्या नोंदणी केल्या जाणार आहेत . राज्य शासनाने या योजनेची मदत ३१ ऑगस्ट पर्यंत वाढवलेली आहे त्यामुळे पुढील ५६ दिवसांमध्ये संपूर्ण सातारा जिल्ह्यामध्ये जास्तीत जास्त पात्र महिला लाभार्थींना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे . दुसरी गोष्ट म्हणजे वेगवेगळ्या सेतू कार्यालयामध्ये महिलांची फॉर्म भरून घेणे फॉर्म विक्री या माध्यमातून आर्थिक लूट केली जात होती राज्य शासनाने या योजनेमध्ये जर कोणी पैशाची मागणी केली तर कडक कारवाईचे संकेत दिले आहेत त्यामुळे घरोघरी होणाऱ्या नोंदणीतूनच महिलांची होणारे लूट थांबणार आहे महिलांनी अनावश्यक तहसीलदार अथवा सेतू कार्यालयामध्ये गर्दी करू नये असे कळकळीचे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

# धनगरवाडीत गावठी हातभट्टी दारू विकणाऱ्यांवर नारायणगाव पोलिसांची कारवाई




नारायणगाव

धनगरवाडी तालुका जुन्नर येथे गावठी हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या महिलेवर नारायणगाव पोलिसांनी कारवाई केली.

जुन्नर तालुक्यातील नारायणगाव पोलीस स्टेशन हद्दीत धनगरवाडी येथे काही इसम गावठी हातभट्टीची दारू चोरून विकत असल्याची माहिती नारायणगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी महादेव शेलार यांना समजली. या माहितीच्या अनुषंगाने आज दिनांक ३ जुलै २०२४ रोजी सकाळी १० वाजता नारायणगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सनील धनवे, पोलीस शिपाई दत्ता ढेंबरे, महिला पोलीस शिपाई शुभांगी दरवडे, पोलीस शिपाई गोरक्ष हासे यांनी धनगरवाडी येथे जाऊन तेथील महिला अनिता विजय मारवाडी वय ४६ वर्ष राहणार धनगरवाडी यांचे घराजवळ जाऊन खात्री केले असता त्या त्यांचे पत्र्याच्या घराशेजारील भिंतीच्या आडोशाला गावठी हातभट्टीची दारू विकत असताना दिसून आल्या. पोलिसांनी या ठिकाणावरून ८ हजार २००/- रुपये किमतीची एकूण ८२ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. असून याघटनेबाबत नारायणगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस नाईक आदिनाथ लोखंडे हे करीत आहेत.

ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे , उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार , पोलीस उपनिरीक्षक सनील धनवे, पोलीस हवालदार संतोष कोकणे, पोलीस नाईक आदिनाथ लोखंडे, पोलीस शिपाई दत्ता ढेंबरे, गोरक्ष हासे, गोरख केंद्रे, महिला पोलीस शिपाई शुभांगी दरवडे यांचे पथकाने केली.

# हिरवाई महोत्सवातील व्याख्यानाला चांगला प्रतिसाद

## उलगडल्या वनस्पतींच्या नावामागच्या कथा !



**पुणे :** पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत 'जीविधा' संस्थेतर्फे आयोजित 'हिरवाई महोत्सव' च्या पहिल्या दिवशी ४ जुलै रोजी 'वनस्पतींच्या नावाभोवतीच्या कथा' विषयावर डॉ. मंदार दातार यांचे व्याख्यान झाले.वनस्पतींच्या नामकरणाची प्रक्रिया ,त्यामागील शास्त्र आणि रंजक किस्से त्यांनी सांगितले. त्यातून वनस्पतींच्या नावामागच्या कथा उलगडल्या ! या व्याख्यानाला चांगला प्रतिसाद मिळाला. राजीव पंडित यांनी स्वागत केले.

डॉ.मंदार दातार म्हणाले, ' परदेशातून विविध कारणाने आलेल्या लोकांनी वनस्पती आणल्या. तसेच एतद्देशीय वनस्पतींना नावे देण्याचा प्रयत्न केला. अनेक महनीय व्यक्तींच्या स्मरणार्थ वनस्पतींची नावे दिली गेली. बंदरांमुळे पोर्तुगिजा नी थेट महाराष्ट्रात अनेक वनस्पती आणल्या. मूळ नावातील साधर्म्य तसेच राहिले. ते हिंदीत मात्र गेले नाही.अनेक नावे मराठीत विविध कारणाने आली.

मिर्चीचे नाव मिरीवरून आले. आधी स्वादासाठी मिरी वापरली जायची. गूळ करण्याचे तंत्र भारतात होते, मात्र साखर करण्याचे तंत्र चीन वरून आल्याने हिंदीत साखरेला चीनी हे नाव पडले.

बेरी, ॲपल हे शब्द अनेक फळांना इंग्रजांनी जोडले. पोर्तुगीज, स्पॅनिश लोकांनी मात्र महाराष्ट्रातील वापरातील नावे कायम ठेवली. दक्षिण अमेरिकेतील नावे काजू सारखी नावे मराठीत वापरली जात आहेत. तिकडे अकाजू म्हटले जायचे.

रामफळ वेस्ट इंडीजमधून आले आहे. ते सीताफळासारखे दिसते म्हणून रामफळ हे नाव दिले गेले. अननस हे नाव ब्राझिलमधून आले. शेंगदाणा दक्षिण अमेरिकेतून आला. आपल्याकडे मूग होताच, भूईवर येणारा शेंगदाणा मुगाशी जोडला गेला आणि भूईमुग झाला !, असेही डॉ. दातार यांनी सांगितले.

बटाटा हे नाव प्रत्यक्षात पटाटा आहे. पण, मराठीत तो बटाटा झाला. बंदरांमुळे पोर्तुगिजा नी थेट महाराष्ट्रात अनेक वनस्पती आणल्या. मूळ नावातील साधर्म्य तसेच राहिले. ते हिंदीत मात्र गेले नाही.

वनस्पतींची नावे द्वी -नामी देण्याची पध्दत कार्ल लीनाईस ने सुरू केली. १३ हजार वनस्पतींना त्याने नावे दिली. बडोदा रेल्वेचे काम करणाऱ्या थिओडर कुक ने वनस्पतींमध्ये खूप रस दाखवला, अभ्यास केला. पुस्तके प्रकाशित केली. जोसेफ हुकर, सांतापाऊ अशा अनेक अभ्यासकांच्या योगदानाची माहिती डॉ.दातार यांनी दिली. भारतात वनस्पतींचे पहिले रंगीत पुस्तक हुकर ने काढले, असेही डॉ. दातार यांनी सांगितले.

दि. ४ ते ७ जुलै दरम्यान भावे प्राथमिक शाळेचा नवीन हॉल(सदाशिव पेठ) येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला असून वनस्पती,प्राणी,हिरवाई आणि पर्यावरण रक्षणाची चर्चा करणारी व्याख्याने, जनजागृती असे या महोत्सवाचे स्वरूप आहे.'जीविधा' संस्थेचे संस्थापक राजीव पंडित यांनी प्रास्ताविक केले.स्थानिक देशी वनस्पतींच्या लागवडीत लोकांचा सहभाग वाढावा यासाठी दरवर्षी 'हिरवाई महोत्सव'आयोजित करते.या उपक्रमाचे यंदाचे १६ वे वर्ष आहे.

दि. ४ ते ७ जुलै दरम्यान सायंकाळी ६.३० ते ८ या वेळेत व्याख्याने होणार आहेत.दि.५ जुलै रोजी लेखिका मृणालिनी

# वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांसाठी हरियाणा पॅटर्न राबवणार

## देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई :** राज्यातील महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण कंपन्यांतील कार्यरत कंत्राटी कामगारांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक आहे. या कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी हरियाणा पॅटर्न राबवणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. तसेच पैसे मागणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करणार, असा इशारा दिला.

आमदार श्रीकांत भारतीय यांनी तीन वीज कंपन्यांत कार्यरत कंत्राटी कामगारांच्या समस्यांबाबत आणि कंत्राटदारांकडून होणाऱ्या पैशाची मागणी संदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांच्या वेतनात मोठी तफावत आहे. महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण कंपन्यातील कर्मचाऱ्यांनी वारंवार तक्रार केल्या. शासन पातळीवर यासंदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणी केली .

महावितरण व महापारेषण कंपनीमध्ये काम करीत असलेल्या कंत्राटी कामगारांना नियमित सेवेतील प्रवेशाचा मार्ग सुकर करण्यासाठी त्यांच्या मागील अनुभवाच्या आधार घेतला जाईल. त्यानुसार त्यांना सरळसेवा भरतीमध्ये प्रती वर्षे दोन गुण असे पाच वर्षांच्या अनुभवासाठी जास्तीत जास्त १० गुण देण्यात येतात. याशिवाय महावितरण कंपनीने विहीत शैक्षणिक अर्हता नसलेल्या कंत्राटी कामगारांना विद्युत सहायक व उपकेंद्र सहायक या पदाकरिता आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याकरिता तीन वर्षांचा अवधी दिला आहे. त्याचप्रमाणे महापारेषण कंपनीत कोणत्याही कंत्राटी कामगारास विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त नसल्यामुळे कमी केलेले नाही. याशिवाय भरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी कामगारांना जास्तीत जास्त प्रमाणात सामावून घेण्यासाठी मुख्य सचिवांसमवेत बैठकीमध्ये चर्चा करून मार्ग काढण्यात येतो आहे. तसेच कामगारांना कमीत कमी वेतन देताना त्यांना ६२ टक्के विविध भत्ते देण्यात येतात. वीज उद्योगाकरिता किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत स्वतंत्र अनुसूची उद्योग म्हणून किमान वेतन निश्चित करण्याची बाब विचाराधीन आहे. याबाबत चार महिन्यांत निर्णय घेऊ, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. तसेच, संबंधित कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत हरियाणा पॅटर्न राबविण्याचे फडणवीस म्हणाले.


पैसे मागणाऱ्यांवर कारवाई

वीज विभागात रिक्त पदांची भरती कंत्राटी पद्धती ऐवजी कायमस्वरूपी पद्धतीने करावी, यावी अशी मागणी श्रीकांत भारतीय यांनी केली. त्यावर कंत्राटदार विरहित कामगारांना किंवा रोजंदारी पद्धतीने सामावून घेता येईल का, बाबतही प्रयत्न केले. परंतु, न्यायालयाच्या निर्देशानुसार कंत्राटी पद्धतीने करावी लागत आहे. भरती करताना पारदर्शी आणि व्यवहारी पद्धतीचा अवलंब केला जाईल, असे फडणवीसांनी सांगितले. तसेच कंत्राटी पद्धतीने भरती केल्यानंतर कर्मचाऱ्यांकडून पैसे मागणांऱ्या ठेकेदारांवर कारवाई केली जाईल, असा इशारा फडणवीस यांनी दिला.

# किल्ले सज्जनगड मार्गावर दरड कोसळली ; वाहतूक ठप्प



**परळी :** किल्ले सज्जनगड मार्गावर सज्जनगड फाटा ते सज्जनगड या वळणावर दरड पडल्यामुळे येथील वाहतूक ठप्प झाली आहे. ठोसेघर, सज्जनगड परिसरात पावसाची उघडझाप सुरू असली तरी पावसाचा जोर कायम आहे. या परिसरात रस्त्यावर दरड कोसळण्याचे प्रकार सुरूच असतात. काल ठोसेघर रस्त्यावर मोठ-मोठी दगडी आली होती तर गुरुवारी सज्जनगड रस्त्यावर मोठे दगड झाडे पडल्यामुळे चार चाकी वाहतूक पूर्णपणे ठप्प आहे.



# केळघर घाटात पडझड सुरूच !

**सातारा :** पावसाची रिपरिप चालु आहे.तशी केळघर घाटात पडझडही ठिकठिकाणी चालु झालेल्या आहेत.

सातारा - महाबळेश्वर रस्त्यावर केळघर घाट नागमोडीचा आहे. एका बाजुला दरडीचा भाग हा केळघर ते महाबळेश्वर असा आहे.वर्षा पर्यटनसाठी पर्यटकांची जा-ये चालूच आहे. रस्त्याचे काम रुंद आणि चांगल्या प्रतीचे झाले असल्याने पावसाच्या सुरुवातीस तरी पडझडीचा अडथळा जाणवत नाही. कोसळणाऱ्या दरडी पूर्ण रस्त्यावर पडल्या तरी अद्याप तरी वाहने जा-ये करीत आहेत.

मात्र,मोठ्या प्रमाणावर दरडी पडल्या तर वाहने जैसे-थे थांबतील.तेव्हा सम्बधितांनी जेसीबी व संबंधित यंत्रणा घाटात सतर्क ठेवणे गरजेचे आहे.अशी मागणी वाहनधारक करीत आहेत.



# साताऱच्या दिव्यांगांच्या लढ्याला आले यश; बहुतांश मागण्या मान्य

**सातारा :** बुधवारी सातारा शहरातील दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेतील दिव्यांगांनी मुंबई येथील विधान भवनासमोर आंदोलन केले होते. दिव्यांगांच्या आंदोलनाला यश आले असून त्यांच्या बहुतांश मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत. सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांनी दिव्यांग सदस्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेऊन त्यांच्या मागण्या अंशतः मंजूर करत मुख्यमंत्री यांच्या सोबत बैठक घेऊन यावर चर्चा करण्याचे आश्वासन दिले .

याबाबत अधिक माहिती अशी, दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांसाठी दिव्यांग प्रेरणा सामाजिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष अजय पवार यांनी वेळोवेळी आंदोलने करीत प्रशासनाला निवेदने सादर केली होती. मात्र, त्याचा काहीच उपयोग होत नसल्याचे दिसून येताच अजय पवार आणि सातारा जिल्ह्यातील दिव्यांगांनी दि. २ रोजी मुंबईतील विधान भवनावरच अधिवेशनस्थळी धडक मारली. याठिकाणी आंदोलनाचे हत्यार उपसल्यानंतर पोलीस प्रशासनाकडून त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न झाला. मात्र, अजय पवार व कार्यकर्ते आपल्या मागण्यांबाबत ठाम राहीले.

या आंदोलनाची दखल घेत आज दि. ३ रोजी दिव्यांग मंत्रालयाचे सामाजिक न्याय सचिव सुमित भांगे यांनी अजय पवार आणि त्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. त्यावेळी पवार यांनी त्यांना निवेदन सादर केले. निवेदनात पवार यांनी ज्या व्यक्तीच्या नावावर जागा नाही अशा दिव्यांगांना घरकुल साठी विना अट जागा मिळावी, रिक्त अनुशेष दिव्यांग बांधवांचा लवकर भरण्यात यावा विशेष भरती करून घेण्यात यावा. दिव्यांगांना रोजगार निर्मिती साधन तयार करण्यात यावे. ई-रिक्षा वाटप केलेल्या रिक्षाचा दिव्यांगासाठी काहीच उपयोग नाही. दिव्यांग यांच्या पाल्यास संपूर्ण शिक्षण मोफत मिळालेच पाहिजे. दिव्यांग बांधवांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात एसटी प्रवास मोफत मिळाला पाहिजे, दरवर्षी तीस लाख खर्च न करणार्या आमदारावर कारवाई करा व त्याचे वेतन बंद करा, दिव्यांगांना राजकीय आरक्षण मिळालं पाहिजे, महाराष्ट्रातील सर्व दिव्यांगांना अंत्योदय लाभ मिळून ३५ किलो धान्य मिळावे, दिव्यांगाना व्यवसायासाठी २०० चौरस फूट जागा विनाअट देण्यात यावी, सातारा जिल्ह्यात शासकीय ऑफिसेसमध्ये तसेच महाविद्यालय, शाळा, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँक, नॅशनल बँक, पोस्ट ऑफिस, स्टेट बँक याठिकाणी वेगळी खिडकी व रॅम्पची सोय करण्यात यावी.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# सोलापूर जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनांचा मुद्दा ऐरणीवर

## आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांची लक्षवेधी



अकलुज, प्रतिनिधी

अगोदर पुनर्वसन मग धरणहे राज्यसरकारचे धोरण असुनही या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या नागरीकांच्या पुनर्वसनाच्या समस्या अजुनही सुटलेल्या नाहीत.आज सोलापुर जिल्ह्यात पुनर्वसन विभागाकडे पुनर्वसित गावांचे नकाशे उपलब्ध नाहीत.धरणग्रस्तांच्या जमीनीवरील भुखंडावरील वहिवाट अडथळे आहेत. धरणग्रस्त गावांचे हद्दी सिमांकन केलेले नाही.भुखंडाचे बेकायदेशिरपणे वाटप झालेले आहे.बहुतांश पुनर्वसित गावांना महसुली दर्जा अद्यापही ही मिळालेला नाही.गावांच्या विद्युतीकरणाच्या समस्या आहेत.काही पुनर्वसित गावांचा गावठाण विस्तार करण्याची गरज आहे. धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सभागृहात लक्षवेधी मांडत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसना मुद्दा उपस्थित केला.

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील म्हणाले, राज्यात सुमारे लहान मोठी ३००० धरणे असुन या धरणांनी राज्याच्या विकासाला हातभार लावलेला आहे.तसेच या धरणांमुळे अनेक गावे बाधित झालेली आहेत. सोलापुर जिल्ह्यात उजनी- ६७ गावे (पुनर्वसन१९७३),कोयना- ७ गावे (पुनर्वसन१९६२),कन्हेर-४ गावे (पुनवर्सन१९७८),बोरी-कुरनुर- ३ गावे(पुवर्सन१९८१),पिंपळगाव-ढाळे- २ गावे(पुवर्सन १९९३), अशी पुनर्वसित गावांची संख्या ८३ एवढी असुन ही गावे अजुनही पुर्ण नागरी सुविधांपासुन वंचित आहेत, एक ना अनेक समस्यांमुळे प्रकल्पग्रस्तांत प्रचंड आक्रोश आहे.यासाठी शासन दरबारी वारंवार पत्रव्यवहार केलेले आहेत.मात्र अजुनही पुनर्वसनासदर्भात अनेक प्रश्न व समस्या प्रलंबित आहेत.

पुढे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी मुद्दे मांडले

पुनर्वसित गावठाणांना पुनर्वसन कायद्यानुसार देय असलेल्या नागरी सुविधांसाठी एकदाच निधी मिळत आहे.देय सुविधांपैकी पैकी किमान १४ सुविधा पुर्ण असतील तरच त्याचे जि.प कडे हस्तांतरण होउन देखभाल दुरुस्ती होते.आज या बहुतांश गावात किमान १४ सुविधा पुर्ण नसलेने आणि जिथे १४ सुविधा पुर्ण आहेत परंतु त्या २५/३० वर्षापुर्वीच्या आहेत त्या देखभाल दुरुस्ती अभावी जीर्ण झालेल्या आहेत.धरणग्रस्तांना प्रकल्पग्रस्त म्हणुन मिळालेल्या दाखल्याचा कुठुंबातील एकाच व्यक्तीला लाभ घेता येतो.तो त्या कुठुंबातील सर्व व्यक्तींना लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

जीर्ण झालेने आता जि.प.हस्तांतरण करुन घेत नाही. एकतर सुविधांसाठी आपल्या विभागाकडुन एकदाच निधी. देखभाल दुरुस्तीची तरतुद नाही. सुविधांचे हस्तांतर होत नाही.मग या गावांतील विकासांचा प्रश्न सोडवण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार?सरसकट पुर्ण सुविधाचे हस्तांतर करुन देखभाल दुरुस्तीसाठी निधीची तरतुद करण्याची आवश्यकता आहे.

पुनर्वसित गावात सिमेंट काँक्रेट रस्त्यांची मागणी असताना गावांतर्गत खडीकरण रस्ते दिले जातात आहेत.बंदिस्त गटार एवजी ओपन गटारची तरतुद आहे.ओपन गटार मुळे डासांची निर्मिती होऊन डेंगु व ईतर रोगांचा धोका असताना पुनर्वसन कायद्यातील तरतुदी अभावी नागरीकांच्या मागणीनुसार सुविधा मिळत नाहीत त्यामुळे पुनर्वसन कायदा १९९९ मधे सुधारणा करणारे देखील गरजेचे आहे .सोलापुर जिल्ह्यातील ३० पेक्षा अधिक पुनर्वसित गावांना अद्यापही महसुली दर्जा मिळालेला नाही त्यामुळे या गावांना शासकीय योजना राबवण्यात अडचणी येत आहेत.१५ व्या वित्त आयोगाचा निधी या गावांना खर्च करता येत नाही.या गावांना महसुली दर्जा देणेबाबत शासन काय कार्यवाही करून या गावांना महसुली दर्जा मिळावा अशी देखील विनंती आ.मोहिते-पाटील यांनी शासनाकडे केली.

उजनी प्रकल्पाअंतर्गत करमाळा तालुक्यातील (खातगाव १,२,३ ) (चिखलठाण १,२,) (सांगवी १,२) (सोगाव पुर्व,पश्चिम),(बिटरगाव (वांगी-बिटरगाव सांगवी),(केत्तुर १,२), (वांगी-४ - भिवरवाडी) या गावांचे पुनर्वसनामुळे दोन भाग झालेले आहेत,भौगोलिक दृष्ट्या ही गावे भिन्न आहेत.एका भागातुन दुसर्या भागाकडे जाताना काही ठिकानी १०/१५ कि.मी अंतर पार करावे लागते,कार्यालय एका भागात असल्याने नागरिकांना सुविधा मिळत नाही,ही गावे पुनर्वसन कायद्यातील लोकसंख्येची अट पुर्ण करतात त्यामुळे हद्द निश्चित करुन त्यांचे विभाजन करुन वेगळ्या ग्रामपंचायती स्थापन करण्याची गरज आहे यावर शासन काय कार्यवाही करून समस्यांचे निराकरण करने गरजेचे आहे असे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी मुद्दा उपस्थित करत पुनर्वसनाचा प्रश्न लवकर सोडावा म्हणून सरकारकडे मागणी केली.

यावर आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन मंत्रालयाकडून उत्तर देण्यात आले. सोलापूर जिल्ह्यामध्ये उजनी, कोयना, कण्हेर, बोरी कुरनुर व पिंपळगांव (ढा) या प्रकल्पाने बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी पंढरपूर, माढा, मंगळवेढा, मोहोळ, करमाळा, अक्कलकोट, बार्शी या तालुक्यामध्ये पुनर्वसन गावठाण निर्माण करण्यात आली आहेत. सोलापूर जिल्ह्यामध्ये उजनी प्रकल्पाचे ६७, कोयना प्रकल्पाचे ६, कण्हेर प्रकल्पाचे ४, पिंपळगांव (ढा) मध्यम प्रकल्पाचे २ व बोरी कुरनुर प्रकल्पाचे ४ असे एकूण ८३ गावठाण पुनर्वसित झालेले आहेत. यापैकी एकूण ४९ गावठाणांना महसूली गावांचा दर्जा मिळाला आहे. उर्वरित गावठाणांना महसुली दर्जा देण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे. सोलापूर जिल्ह्यातील एकूण ८३ पुनर्वसित गावठाणाचे सन २०१३ मध्ये नगर नचना विभागामार्फत गावठाण मोजणी करण्यात आलेले आहे त्यापैकी एकूण ५७ गावठाणांचे नकाशे उपलब्ध आहेत. उर्वरित गावठाणांचे नकाशे नगर रचना विभागाकडून प्राप्त करून घेणेत येत आहेत.

सोलापूर जिल्ह्यामध्ये एकूण ८३ गावठाणापैकी ६७ गावठाणामध्ये प्रकल्पग्रस्त यांचा रहिवास आहे. प्रत्येक गावठाणामध्ये १८ नागरी सुविधा याप्रमाणे एकूण १२०६ (बांधकाम विषयक ७३७ व खुली जागा ४६९) नागरी सुविधा पुरवावयाच्या आहेत. बांधकाम विषयक एकूण ७३७ नागरी सुविधांपैकी ५२९ नागरी सुविधा पुर्ण झाल्या आहेत. सदर नागरी सुविधांची देखभाल होण्याच्या दृष्टीने या नागरी सुविधांचे हस्तांरण करणे आवश्यक असल्याने दिनांक १२/१२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली नागरी सुविधा हस्तांतरण बाबत संबधित सर्व यंत्रणांची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे निर्देशानुसार शासन परिपत्रक दिनांक २३/११/२०१० नुसार जिल्हास्तरीय संयुक्त समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीकडुन विहीत वेळापत्रकानुसार पुनर्वसन गावठाणास भेटी देऊन नागरी सुविधांच्या दर्जाची तपासणी करण्यात आली आहे. सदर समितीचा १८ नागरी सुविधा हस्तांतरण करण्याबाबतचा तपासणी अहवाल जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने रोजी सोलापूर जिल्ह्यातील एकूण ८३ गावठाणांतील सुस्थितीत असलेल्या ५०९ नागरी सुविधा जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्याची कार्यवाही सुरू असल्याचे शासनाच्या वतीने सांगण्यात आले.

# राजगुरुनगर ते पुणे बस सेवा पुन्हा सुरू करावी

## ग्राहक हक्क समितीची मागणी

**राजगुरूनगर :** राजगुरुनगर ते पुणे स्टेशन पीएमपीएमएल अशी थेट बस सेवा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी खेड तालुका ग्राहक हक्क समितीच्या वतीने लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

राजगुरुनगर ते पुणे स्टेशन अशी थेट बस सेवा सर्वप्रथम १९९० साली सुरू केली होती. प्रवाशांकडून त्याला मोठा प्रतिसाद सुद्धा मिळत होता. ग्रामीण भागातून पुण्यात उच्च शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थी व नोकरदार मंडळींची पुण्याला ये-जा करण्याची सोय व्हायची. पुणे महानगर परिवहन महामंडळाला नफा मिळवून देणाऱ्या या मार्गावरील बस सेवा प्रवाशांच्या



सुद्धा सोयीची होती. परंतु, २०१८ पासून महामंडळाने ही थेट बस सेवा बंद केली. राजगुरुनगर ते भोसरीपर्यंत अशी बस सेवा सुरू केली. यामुळे थेट पुण्यात जाणाऱ्या विद्यार्थी व नोकरदारांची गैरसोय झाली. विद्यार्थी व चाकरमान्यांना भोसरी येथे उतरून पुन्हा दुसऱ्या बसच्या मदतीने पुणे स्टेशन किंवा पुण्यातील इतर भागात जावे लागत आहे.

थेट बस सेवा बंद केल्याने राजगुरुनगरहून पुण्यात उच्च शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या शेकडो विद्यार्थी व नोकरदारांचे हाल होत आहेत. त्यांचा वेळ सुद्धा वाया जात आहे. प्रवासासाठी कराव्या लागणाऱ्या दररोजच्या कसरतीमुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक, मानसिक व शैक्षणिक नुकसान होत आहे. शेकडो विद्यार्थी व चाकरमान्यांची गैरसोय लक्षात घेता पीएमपीएमएल प्रशासनाने पुन्हा राजगुरुनगर ते पुणे स्थानक अशी थेट बस सेवा सुरू करावी, अशी मागणी ग्राहक हक्क समितीचे अध्यक्ष रंगनाथ सुतार, सचिव विद्याधर साळवे व जेष्ठ सामाजीक कार्यकर्ते रविंद गुजराथी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

**भोसरी येथे राजगुरूनगर, चाकण येथे जाण्यासाठी बसमध्ये चढताना रात्रीच्या वेळेस खूप मोठया प्रमाणात गर्दी होत असते. त्याचाच फायदा घेऊन भुरटे चोर प्रवाशांचे मोबाईल, पैश्यांचे पाकीट, अनमोल वस्तूंवर डल्ला मारतात व हातोहत गायब करतात. त्यामुळे खूप मोठया नुकसानास प्रवाश्यांना तोंड द्यावे लागते. हाच प्रवास थेट पुणे ते राजगुरूनगर असा असल्यास चोरी मारी चे प्रमाण काही प्रमाणात कमी जाणवेल.**

**- अनिल मारुती राक्षे.**

# दुधाला ३५ रुपये दर देण्यास शासनाची तत्त्वत: मान्यता : आ. बबनदादा शिंदे

## दुग्ध विकास मंत्री नामदार विखे पाटील यांच्या बैठकीत निर्णय

**टेंभुर्णी :** मागील कित्येक महिन्यापासून दुधाला चाळीस रुपये प्रतिलिटर दर मिळावा यासाठी दूध उत्पादक शेतकरी राज्यभर रस्त्यावर उतरत होते, रस्ता रोको , उपोषण, रस्त्यावर दुधाचा महापूर अशी वेगवेगळी आंदोलने दूध उत्पादक करत आहेत .या संदर्भात मंत्रालयात दुग्धविकास मंत्र्यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी आयोजित केलेल्या आजच्या बैठकीत राज्यातील प्रत्येक दूध संघाने दुधाला प्रति लिटर ३० रुपये दर देणे बंधनकारक केले आहे. तर पाच रुपये प्रति लिटर शासन अनुदान देण्याचा निर्णय विधानसभेत घेण्यात आला आहे,तसेच राज्यातील दूध पावडर बनवणा-या दुध संघास एक किलोस शासन तीन रुपये अनुदान देणार असल्याचेही दुग्धविकास मंत्र्यांनी जाहीर केले. तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून ताबडतोब निर्णय कळवला जाईल अशी ग्वाही नामदार विखे पाटील यांनी बैठकीत दिल्याची माहिती आमदार बबनदादा शिंदे यांनी दिली आहे.

या बैठकीला आमदार बबनदादा शिंदे यांचे सह माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, विनय कोरे, मोनिका राजुरे,संजय मामा शिंदे ,हे आमदार तर माजी आमदार सदाभाऊ खोत आयुक्त प्रसाद मोहोळे राज्यातील विविध दूध संघाचे प्रतिनिधी यांचे सह संबंधित मंत्रालय अधिकारी उपस्थित होते.

**जनावरे पडताळणीस मुदतवाढ,**

**बंद पडलेले पोर्टल लवकरच चालू होणार...**

**राज्य शासनाने दुधाला प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्याचे ३ मार्च २४ रोजी जाहीर केले होते परंतु त्यामध्ये राज्यातील प्रत्येक दूध उत्पादकाच्या जनावरांची पडताळणी करून त्याची संपूर्ण माहिती शासनाला २४ मार्चपर्यंत ऑनलाईन कळवण्याची अट घातली होती परंतु ही माहिती भरण्यासाठीचे पोर्टलच बंद पडले होते , एवढ्या अल्पमुदतीत जनावरांची पडताळणी करणे शक्य नव्हते, त्यातच लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या त्यामुळे आमदार बबनदादा शिंदे यांनी ही मुदत वाढवून मिळावी व बंद पडलेले पोर्टल तातडीने चालू व्हावे अशी मागणी पत्राद्वारे शासनाकडे केली होती, त्याही विषयावर या बैठकीत चर्चा होऊन यापुढे जनावराच्या पडताळणीची मुदत वाढवण्यात येईल बंद असलेले पोर्टल देखील तातडीने सुरू करण्यात येईल अशी ग्वाही दूध विकास मंत्री महोदयांनी बैठकीत दिली.**

**- आमदार बबनदादा शिंदे माढा**

## सोन्याची अंगठी लांबवल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

सातारा ; सातारा रहिमतपूर रोडवर दोन अनोळखी इसमानी हातचलाखी करून एका वृद्धाची पंधरा हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी लांबवली . याप्रकरणी श्रीपतराव तुकाराम पाटील वय ७७ राहणार समर्थ नगर एमआयडीसी सातारा यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दिनांक ३ जुलै रोजी सायंकाळी पावणे सहाच्या दरम्यान फिर्यादी पाटील घराच्या दिशेने जात असताना विजयनगर कॉर्नर येथे दोन अनोळखी इसमानी मोटरसायकलवर येऊन त्यांना पत्ता विचारण्याचा बहाणा केला आणि हातलाखीने त्यांची हातातली सोन्याची अंगठी गायब केली . पोलीस कॉन्स्टेबल वाघ अधिक तपास करत आहे.

## पोलीस असल्याची बतावणी करून दुचाकी लांबवली

सातारा : पोलीस असल्याचा बहाना करून दुचाकी लांबवल्याप्रकरणी निखिल पाटील याच्यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे याप्रकरणी सुषमा चंद्रकांत गाडगे वय ३६ राहणार खिंडवाडी तालुका सातारा यांनी ही फिर्याद दिली आहे.

दिनांक सात जून रोजी सकाळी साडेनऊच्या दरम्यान चहाच्या टपरीत येऊन संबंधित आरोपी निखिल पाटील यांनी मी पोलीस खात्यात काम करतो असे सांगून सातारा पॉलीटेक्निक कॉलेज सातारा येथे मित्राला भेटायला जायचे आहे तुमची मला जुपिटर गाडी द्या मी लगेच जाऊन येतो असे सांगितले आणि फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्याने गाडी परत माघारी दिली नाही . पोलीस हवालदार निकम आणि तपास करत आहेत.

## साडेसहा लाखाचा मुद्देमाल पोलिसांच्या ताब्यात

सातारा : शाहूपुरी पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी चिकाटीने तपास करून महाराष्ट्रासह इतर राज्यातील नागरिकांचे गहाळ मोबाईल परत मिळवले आहेत .एकूण २८ मोबाईल शाहूपुरी शाखेच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने हस्तगत केले. आहेत . एकूण मुद्देमाल साडेसहा लाख रुपयांचा आहे याबाबतची माहिती शाहूपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र सावंत्रे यांनी दिली आहे.

## अभिनेत्री श्वेता शिंदे यांच्या घरातील घरफोडीतील अट्टल आरोपी वाढे फाटा येथे जेरबंद

सातारा : विसावा नाका येथील अभिनेत्री श्वेता शिंदे यांच्या घरी झालेल्या चोरीचा पर्दाफाश स्थानिक गुन्हे शाखेने केला आहे .या घरफोडी प्रकरणातील अट्टल आरोपी राजकुमार उर्फ राजू ओंकाराप्पा आपचे राहणार कोथळी तालुका उमरगा जिल्हा धाराशिव याला स्थानिक गुन्हे शाखेने वाढे फाटा येथे जेरबंद करून ताब्यात घेतले. त्याच्याकडून १८.३ तोडे वजनाचे १३ लाख ३१ हजार चारशे रुपये किमतीची सोने चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत आरोपीने तीन घोरफोडी केल्याची कबुली दिली आहे .

# ढोल ताशांच्या गजरात वर्ल्ड चॅम्पियन थिरकले

**मुंबई :** गर्दीचा उसळलेला जनसागर, फुलांचा वर्षाव, घोषणांची आतषबाजी आणि ढोल ताशांच्या गजरात गुरूवारी वर्ल्ड चॅम्पियन टीम इंडियाचे मुंबईकरांनी प्रचंड उत्साहात स्वागत केले. टीम इंडियाची ओपनडेक बस मधून मरीन ड्राईव्ह ते वानखेडे स्टेडिअमपर्यंत विजयी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी लाखो मुंबईकर सहभागी झाले होते. टीम इंडियाने तिरंगा, वर्ल्ड कप ट्रॉफी उंचावत मुंबईकरांच्या प्रेमाचा आणि शुभेच्छा स्वीकार केला. यावेळी ढोल ताशांच्या गजरात वर्ल्ड चॅम्पियन थिरकले.

२००७ साली पहिल्यांदा टी २० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर मुंबईकरांनी मोठ्या जल्लोषात टीम इंडियाचं स्वागत केलं होतं. यंदा बार्बाडोसमध्ये टीम इंडियानं दुस-यांदा टी २० वर्ल्डकप जिंकला. त्यामुळे क्रिकेट प्रेमींच्या उत्साहाला उधाण आले आहे. तब्बल १७ वर्षानंतर टीम इंडियाने देशाला टी २० विश्वचषक जिंकून दिल्याने क्रिकेट चाहत्यांकडून प्रचंड कौतुक होत आहे. विश्वविजेत्यांच्या स्वागतासाठी मुंबईकरांनी मरिन ड्राईव्हवर तोबा गर्दी केली होती. टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा याच्या नावाने जोरदार घोषणाबाजी करण्यात आली . मुंबईचा राजा रोहित शर्मा अशी घोषणाबाजी करण्यात आली.

नरिमन पॉईंट, मरीन ड्राईव्ह परिसरात नेहमी पर्यटक येत असतात. मरीन ड्राईव्हच्या कट्ट्यावर समुद्राला येणारं उधाण, समुद्राच्या लाटा पाहण्यासाठी नेहमी गर्दी बघायला मिळते. पण आज मरीन ड्राईव्हच्या रस्त्यावर क्रिकेट चाहत्यांचा भलामोठा जनसागरच लोटला होता. अबालवृध्द सगळेच उत्साहात सामील झाले होते. मुंबई विमानतळापासून वानखेडे स्टेडियमपर्यंत जागोजागी मुंबईकर वर्ल्ड चॅम्पियन्सच्या स्वागतासाठी सज्ज झाले होते. क्रिकेट चाहत्यांची गर्दी इतकी वाढली होती कि पोलिसांना नियंत्रणात आणताना नाकीनऊ येत होते. मुंबई विमानतळावर उतरल्यानंतर टीम इंडिया एका बस मरीन ड्राईव्ह परिसरात दाखल झाले. यावेळी या मार्गावरील रस्त्यावर चौका, चौकात रस्त्याच्या दुतर्फा लाखो मुंबईकर स्वागतासाठी उभे होते. प्रत्येकजण जल्लोष करीत हात उंचावीत टीम इंडियाला शुभेच्छा देत होते. टीम इंडियाने प्रतिसाद देत हात उंचावत अभिवादन केले. हजारो क्रिकेट प्रेमींमध्ये एकच जल्लोष पसरला होता. वरूण राजाने हजेरी लावली मात्र मुंबईकरांचा उत्साह वाढतच होता. ओपनडेक बस मधून मरीन ड्राईव्ह ते वानखेडे स्टेडिअमपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# पुण्यात स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभारणार : वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई :** पुणे शहरातील ससून सर्वोपचार रुग्णालय दर्जेदार आरोग्य सेवा देणारे आहे. या रुग्णालयाच्या परिसरात कर्करोग रुग्णालय उभारणीबाबत कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. या रुग्णालयासमोर जागा आहे. ही जागा मिळण्याबाबत सकारात्मक निर्णय घेवून ससून रुग्णालय परिसरात स्वतंत्र शासकीय कर्करोग रुग्णालय उभारण्यात येईल, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

ससून रुग्णालयाबाबत सदस्य भीमराव तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, यशोमती ठाकूर, अनिल देशमुख, विश्वजित कदम, रवींद्र धंगेकर, अशोक पवार, माधुरी मिसाळ यांनी भाग घेतला.

मंत्री मुश्रीफ म्हणाले, ससून रुग्णालयात बेरियाट्रिक शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर उपलब्ध करून देण्यात आले आहे. नवजात बालकांवरील उपचारांसाठी डॉक्टरांची संख्या पुरेशी असून उपचारांसाठी अतिदक्षता विभागात खाटांची संख्या वाढविण्यात येणार आहे. ससूनमधील सुविधा व सद्य:स्थितीबाबत पुणे शहरातील सर्व लोकप्रतिनिधींची बैठक घेऊन रूग्णालयाच्या पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात येईल. वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही एमपीएससीमार्फत करण्यात येत आहे. गट 'क' मधील सर्व रिक्त पदे भरण्यात आली आहेत. गट 'ड' पदाची रिक्त पदे भरण्यासाठी कंत्राटी स्वरूपात स्थानिकस्तरावर जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले आहे.

# पाणी से मस्ती.... जान ले सक्ती : ठोसेघरमध्ये पोलिसांची नियुक्ती

## हुल्लडबाजी केल्यास होणार कठोर कारवाई

**सातारा :** ठोसेघर, ता. सातारा येथील धबधब्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर खबरदारीचा उपाय म्हणून पोलीस तैनात करण्यात आले असून पर्यटकांनी पर्यटन स्थळावर संयुक्त वन व्यवस्थापन समिती आणि पोलिसांनी घालून दिलेले नियम पाळावेत. मद्यप्राशन करून हुल्लडबाजी केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असून पाणी से मस्ती जान ले सक्ती असा मोलाचा सल्ला सातारा तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांनी दिला आहे.



**ठोसेघर येथील संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ तैनात करण्यात आलेले पोलीस.**

गेल्या काही दिवसांपासून मान्सूनने दमदार हजेरी लावली असून दिवस- रात्र पाऊस पडत आहे. त्यामुळे ओढ, नाले दुथडे भरून वाहत आहे. नदीच्या पाणी पात्रात वाढ होत आहे. धबधबे प्रवाहित झाले असल्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणावर धबधबे पाहायला जात आहेत. दोन दिवसापूर्वी भुशी डॅम येथे घडलेली दुर्घटना, सातारा तालुक्यातील केळवली धबधब्यात वाहून गेलेला युवक या घटनांच्या पार्श्वभूमीवर सातारा जिल्हा पोलीस दल सजग झाले असून देशातील प्रसिद्ध अशा ठोसेघर धबधब्याच्या मुख्य प्रवेशावर पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

याबाबत संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकरराव चव्हाण यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, २०१२ साली अति उत्साहामुळे धबधब्याकडून काही जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर समितीच्या माध्यमातून अनेक ठोस उपाययोजना करण्यात आल्या. सुरक्षा रॅलीग, प्रेक्षक गॅलरी, छोट्या धबधब्याजवळ तारेचे कुंपण घालण्यात आले. समितीच्या माध्यमातून शक्य तेवढ्या उपाययोजना करण्यात येत असून पर्यटकांनी अति उत्साही न होता पर्यटनाचा आनंद लुटावा. ठोसेघर येथे पर्यटकांच्या सुरक्षेसाठी दोन पोलीस नेमण्यात आले आहेत. त्याबाबत समितीच्यावतीने मी जिल्हा पोलीस दलाचे आभार मानतो.

पोलीस निरीक्षक निलेश तांबे म्हणाले, पावसाचा जोर वाढल्यामुळे पर्यटक पावसात भिजण्यासाठी, धबधबे पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पर्यटन स्थळावर गर्दी करत आहेत. तीन ते चार दिवसांपूर्वी केळवली येथील धबधब्यात झालेली दुर्घटना पाहता सातारा तालुक्यात तशा प्रकारची घटना कोठेही होऊ नये यासाठी ठोसेघर येथील धबधब्याच्या मुख्य मुख्य प्रवेशद्वारा जवळ पोलिसांची नियुक्ती करण्यात आली आहे. पर्यटकांनी पोलिसांना सहकार्य करावे, धबधब्यात अथवा खोल पाण्यात उतरू नये. पर्यटन स्थळावर संयुक्त वन व्यवस्थापन समिती आणि पोलिसांनी केलेल्या उपाययोजना अमलात आणाव्यात. सातारा तालुक्यातील कोणत्याही पर्यटन स्थळावर मद्य प्राशन करून कोणी हुल्लडबाजी करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



# हार्दिक पांड्याचा पराक्रम

## अष्टपैलू खेळाडूमध्ये पटकावलं अव्वल स्थान

**मुंबई :** अष्टपैलू हार्दिक पांड्याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. आयसीसीच्या टी२० क्रमवारीत अष्टपैलूंच्या यादीत अव्वल स्थानावर विराजमान होणारा हार्दिक पांड्या पहिला खेळाडू ठरलाय. २०२४ टी२० विश्वचषकात हार्दिक पांड्याने अष्टपैलू खेळी करत विजयात सिंहाचा वाटा उचलला. फायनलमध्ये हार्दिक पांड्याने भेदक गोलंदाजी करत विजय खेचून आणला. फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये भारतीय खेळाडूंनी दबदबा निर्माण केला होता. आता अष्टपैलूंच्या यादीत हार्दिक पांड्याने नवा किर्तिमान रचला आहे. टी२० क्रमवारीत विराट कोहली, सूर्यकुमार आणि जसप्रती बुमरहा यांनी याआधी अव्वल स्थानावर कब्जा मिळवलाय. आता अष्टपैलूंच्या यादीत हार्दिक पांड्याने झेंडा रोवलाय.

हार्दिक पांड्याने टी२० विश्व कप २०२४ च्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यासोबतच त्यानं मोठा रेकॉर्डही नावावर केलाय. टी२० क्रमवारीत अष्टपैलूंच्या यादीत अव्वल स्थानावर विराजमान होणारा हार्दिक पांड्या पहिला खेळाडू ठरलाय.

हार्दिक पांड्या श्रीलंकेचा वानिंदु हसरंगा याच्यासोबत संयुक्तपणे टी२० अष्टपैलूंच्या यादीत पहिल्या स्थानावर आहे. पांड्या आणि हसरंगा यांना २२२ रेटिंग गुण मिळाले आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचा मार्कस स्टॉयनिस आहे. झम्बाब्वेचा सिकंदर रजा चौथ्या स्थानावर आहे. तर बांगलादेशचा शाकीब अल हसन पाचव्या क्रमांकावर आहे.

# नाफेड, एनसीसीएफकडून कांदा खरेदीत गैरव्यवहार

## ईडी, सीबीआयमार्फत चौकशीची मागणी!



**मुंबई :** राज्यात केंद्र सरकारकडून देशांतर्गत कांद्याचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी पाच लाख कांदा राखीव साठा करण्यासाठी खरेदी केला जात आहे. ही कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफ या दोन सहकारी संस्थांच्या माध्यमातून केली जात आहे. मात्र, आता या दोन्ही संस्था राज्यातील काही निवडक फार्मर प्रोडूसर कंपन्या व कंपन्यांचे फेडरेशन यांच्यामार्फतच ही सरकारी कांदा खरेदी करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**कसा होतोय खरेदीदरम्यान गैरव्यवहार?**

फार्मर प्रोड्युसर कंपन्या आणि फेडरेशनकडून कांदा खरेदी करताना हा संपूर्ण गैरप्रकार करताना संबंधित कंपन्यांनी नात्यातील व काही जवळच्या शेतकऱ्यांचे बँक पासबुक, सातबारा उतारा, आधार कार्ड या कागदपत्रांची पूर्तता करून आधीचा गोडाऊनमधील स्वस्त दरातील कांदा तसेच आता काही ठराविक व्यापाऱ्यांकडून स्वस्तातील कांदा घेऊन हाच कांदा नाफेड एनसीसीएफसाठी खरेदी केल्याचे दाखवले जात आहे. अशा तक्रारी अनेक शेतकऱ्यांनी संघटनेकडे केल्या आहेत. असेही दिघोळे यांनी पत्रात म्हटले आहे. हा कांदा खरेदी दरम्यान कोट्यवधींचा घोटाळा असून, त्याची सखोल चौकशी करावी, असेही संघटनेने म्हटले आहे.

**संयुक्त बैठक घेण्याची मागणी**

दरम्यान, पुढील हंगामाबाबत कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता, कांदा बियाणे, कांदा उत्पादन, कांदा विक्री व्यवस्था, कांदा निर्यात धोरण तसेच कांदा प्रक्रिया उद्योग याबाबतच्या महत्त्वाच्या विषयावर कायमस्वरूपी धोरण ठरवण्यासाठी एक बैठक घेण्यात यावी. ज्यामध्ये केंद्रीय कृषिमंत्री, वाणिज्य मंत्री संबंधित विभागाचे अधिकारी महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांची शिष्टमंडळ यांचे समावेश असावा, अशी मागणीही भारत दिघोळे यांनी आपल्या पत्रात केली आहे.

### आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी व्हावी

**दिल्लीहून नुकतीच केंद्र सरकारची समिती नाशिक जिल्ह्यात आली होती. यावेळी महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेकडून संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी समितीला हे पत्र दिले आहे. इतकेच नाही तर नाफेड आणि एनसीसीएफ या दोन सहकारी संस्थांच्या माध्यमातून होणाऱ्या सरकारी कांदा खरेदीदरम्यान होत असलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची देखील सखोल चौकशी ईडी व सीबीआयमार्फत करावी, अशी मागणीही त्यांनी या पत्राद्वारे केंद्रीय समितीला केली आहे.**



# चंपई सोरेन यांनी दिला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

## हेमंत सोरेन पुन्हा होणार CM

**झारखंड :** काही महिन्यांवर आलेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी झारखंडमध्ये पुन्हा एकदा नेतृत्व बदल होत आहे. झारखंडचे विद्यमान मुख्यमंत्री चंपई सोरेन यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला असून, हेमंत सोरेन हे राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. हेमंत सोरेन यांची पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदी निवड करण्याचा निर्णय झारखंड मुक्ती मोर्चा आणि इंडिया आघाडीच्या आमदारांनी घेतला आहे. त्यानुसार सरकार स्थापनेचा दावा करण्यासाठी हेमंत सोरेन हे राजभवनाकडे रवाना झाले आहेत.

हेमंत सोरेन यांना काही महिन्यांपूर्वी मनी लॉंड्रिंगप्रकरणी ईडीकडून अटक करण्यात आली होती. तत्पूर्वी त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. दरम्यान, नुकताच कोर्टाने त्यांना जामीन मंजूर केल्यानंतर त्यांची तुरुंगातून मुक्तता झाली आहे. हेमंत सोरेन हे तिसऱ्यांदा झारखंडच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. ते झारखंडचे तेरावे मुख्यमंत्री असतील. १५ नोव्हेंबर २००० रोजी बिहारचे विभाजन करून झारखंड या नव्या राज्याची निर्मिती करण्यात आली होती. दरम्यान, आज मुख्यमंत्री चंपई सोरेन यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत हेमंत सोरेन यांची विधानसभेतील आमदारांच्या दलाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली होती. हेमंत सोरेन यांनी ३१ मे रोजी अटकेची कारवाई होण्यापूर्वी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता.

# हर्षवर्धन पाटील विधानसभा अपक्ष लढणार?

**मुंबई :** 'आमचा स्वाभिमान आमचे विमान', इंदापुरात बॅनर झळकले, इंदापूरच्या राजकारणात पडद्यामागे अनेक घडामोडी घडत असल्याचे संकेत मिळत आहेत. या जागेवरुन महायुतीत धुसफूस होण्याची शक्यता आहे. कारण या जागेवर भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांचा दावा आहे. पण इथे अजित पवार गटाचे दत्तात्रय भरणे हे विद्यमान आमदार आहेत. त्यामुळे विधानसभा निवडणुकीवेळी भाजप आणि राष्ट्रवादीत इंदापूरच्या जागेवर कुस्ती होते का? ते आगामी काळात स्पष्ट होईलच. पण त्याआधी हर्षवर्धन पाटील यांच्याकडून अपक्ष लढण्याचे संकेत देण्यात येत आहेत का? अशी चर्चा आता रंगू लागली आहे. या चर्चा रंगण्यामागील कारणही तसंच आहे. कारण इंदापुरात विमानाचा फोटो असलेला बॅनर झळकवण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात काय-काय घडामोडी घडतात? ते पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे. देशात लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या आहेत. राज्यात महायुतीला लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसला आहे. विशेष म्हणजे या पराभवानंतर महायुतीच्या काही नेत्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटाकडे बोट दाखवण्याचा देखील प्रयत्न केला. यावेळी अजित पवार गटाचे अमोल मिटकरी यांच्याकडून सडेतोड प्रत्युत्तरही देण्यात आलं. पण विधानसभा निवडणुकीच्या आधी ही युती तशीच अबाधित राहते का? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. सध्याचं वातावरण पाहता राज्यात विधानसभा निवडणुकीवेळी महायुतीचे तीन घटक पक्ष एकत्र राहू शकतात. पण भाजपचे इंदापुरातील दिग्गज नेते हर्षवर्धन पाटील हे आगामी विधानसभा निवडणुकीत अपक्ष निवडणूक लढवण्याच्या तयारीत तर नाही ना? असा प्रश्न निर्माण होत आहे. असा प्रश्न निर्माण होण्यामागील किंवा अशी चर्चा सुरु होण्यास इंदापुरातील एक बॅनर कारणीभूत ठरलं आहे.

# जगभर फिरतात, पण मणिपूरला जात नाहीत

## काँग्रेसची पीएम नरेंद्र मोदींवर बोचरी टीका

**मणिपूर :** संसदेच्या विशेष अधिवेशनात राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावाच्या चर्चेदरम्यान पंतप्रधाननरेंद्र मोदीयांनी बुधवारी (३ जुलै)मणिपूर हिंसाचारावरभाष्य केले होते. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले. मात्र, आता काँग्रेसच`सरचिटणीस जयराम रमेश यांनी पंतप्रधानांच्या मणिपूरवरील वक्तव्यावर हल्लाबोल केला आहे.

जयराम रमेश म्हणाले की, पंतप्रधान मणिपूरच्या मुद्द्यावर गप्प का बसले? त्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट का घेतली नाही? त्यांनी खासदार आणि आमदारांशी का चर्चा केली नाही? त्यांनी यापूर्वीच या घटनेवर बोलायला हवे होते. ते वेगवेगळ्या देशांना भेटी देतात, पण त्यांना मणिपूरला जायला वेळ नाही. यावरुन पंतप्रधानांना परिस्थितीची किती चिंता नाही, असा संदेश जातो. पंतप्रधानांनी राज्यसभेत मणिपूरबद्दल जे सांगितले, ते वास्तवाच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. मणिपूर ३ मे २०२३ पासून जळत आहे. समुदायांमध्ये तणाव आणि हिंसाचार सुरू आहे. फेब्रुवारी २०२२ मध्ये भाजप आणि त्यांच्या मित्रपक्षांना राज्यात दोन तृतीयांशपेक्षा जास्त मते मिळाले, पण आजपर्यंत पंतप्रधानांनी मणिपूरचा दौरा केला नाही. मणिपूरचे लोक आजही पंतप्रधान का येत नाही, अशी विचारणा करतात. राष्ट्रपतींच्या अभिभाषणातही मणिपूरचा फारसा उल्लेख नव्हता. हा दांभिकपणा आहे, अशी टीका जयराम रमेश यांनी केली.



# पंढरपूरला जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी

## भाविकांना करावं लागल 'हे' काम



**मुंबई :** अवघ्या महाराष्ट्राला पांडुरंगाचे वेड लागलं असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून पंढरीच्यादिशेने टाळ-मृदुंगाचा गजर करत, मुखी हरीनाम जपत दिंड्या पंढरीकडे निघाल्या आहेत. ऊन, पाऊस, वाऱ्यासह निसर्गाच्या विविध संकटांचा सामना करत वारकरी पंढरीकडे पाऊलं टाकत आहेत. तर, एसटी महामंडळानेही हजारो बस पंढरीच्या वारीसाठी सोडल्या आहेत. याशिवाय खासगी वाहनांचीही मोठी संख्या पंढरपूरकडे ये-जा करत असते. वारीच्या कालावधीत पंढरीत लाखो वैष्णवांचा मेळा जमतो. कार, बससह विविध वाहनांतून वारकरी, भाविक भक्त मोठ्या संख्येने चंद्रभागेच्या तिरी जमतात. या भाविकांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही आषाढी वारीसाठी येणाऱ्या-जाणाऱ्या भाविकांना टोलमाफी देण्यात आली आहे. आजपासून २१ जुलैपर्यंत ही टोलमाफी असणार आहे.

कोकणातील गणेशोत्सवाप्रमाणे पंढरपूर येथे आषाढीच्या वारीसाठी जाणाऱ्या वारकऱ्यांच्या वाहनांना टोल माफ करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गतवर्षी जाहीर केला होता. कोरोनामुळे दोन वर्षे खंड पडल्यामुळे गतवर्षी वारकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचं दिसून आलं, त्याचा विचार करून सरकारने गतवर्षी वारीसाठी येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांना टोलमाफी केली होती. आता, यंदाही राज्य सरकारने टोलमाफीचा निर्णय घेतला असून आजपासूनच पंढरपूरकडे जाणाऱ्या वाहनांना टोलमाफीचा लाभ मिळणार आहे.

**१७ जुलै रोजी आषाढी**

यावर्षी आषाढी एकादशी १७ जुलै रोजी होत असून यात्रेत यंदा प्रथमच अगदी भंडीशेगावपासून पंढरपूर शहरापर्यंत ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यंदाची आषाढी एकादशी आजपर्यंतच्या आषाढीतील बेस्ट असेल असा विश्वास सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी एबीपी माझाशी बोलताना व्यक्त केला. यावर्षी प्रथमच भंडीशेगाव , वाखरी या पालखी मार्गावरील इमारती , झाडांना आकर्षक विद्युत रोषणाई करून लाखो भाविकांचे स्वागत केले जाणार आहे. यानंतर पालखी सोहळे पंढरपुरात पोचल्यावर इसबावी , कॉलेज चौक , चंद्रभागा वाळवंट , भाविकांचे निवासस्थळ असणारे ६५ एकरावरील भक्तिसागर अशा विविध ठिकाणी हे आकर्षक विद्युत रोषणाई केली जाणार आहे. यासाठी विविध जागांची पाहणी केली असून पालखी सोहळे येण्यापूर्वी ही विद्युत रोषणाई पूर्ण केली जाणार आहे.

**२१ जुलैपर्यंत मिळणार टोलमाफी**

**पंढरपूरला आषाढी कार्तिकी निमित्त जाणाऱ्या व परत येणाऱ्या पालख्या आणि वाहनांना पथ करातून सूट देण्यात आली आहे. वारीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांच्या वाहनांसाठी परिवहन विभागातून आवश्यक स्टीकर्स दिले जाणार आहेत. विशेष म्हणजे ३ जुलै ते २१ जुलै या कालावधीत पंढरपूरला जाणाऱ्या आणि पंढरपूरहून गावी जाणाऱ्या सर्वच वाहनांना ही सवलत असणार आहे. दरम्यान, गरज पडल्यास सुरक्षित व सुरळीत वाहतूकीसाठी वारीतील वाहने सोडून अवजड वाहनांना वारी मार्गावर बंदी घालण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.**

**महामंडळाच्या बसेसनाही टोलमाफी**

**महाराष्ट्र राज्यातून पांढरपूरकडे येणारे सर्व पथकर नाक्यांवर उपरोक्त कालावधीत पथकर माफी नसलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसनाही पथकरातून सूट देण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत.**

# एजंटच्या नादी लागू नका, लाडकी बहिण योजनेबाबत देवेंद्र फडणवीसांचे आवाहन



**मुंबई :** लाडकी बहिण योजनेबाबत सर्व भगिनींना विनंती करतो की, एजंटच्या नादी लागू नका. कोणी एजंट येत असेल तर तक्रार करा. अमरावतीमध्ये एका सरकारी कर्मचाऱ्याने गडबड करण्याचा प्रयत्न केला. काल त्याला नोकरीतून काढून टाकलं, सस्पेंड केलं. त्याला बडतर्फ करण्याचा विचारही राज्य सरकार करत आहे. सेतू कार्यालय किंवा अंगणवाडी सेविकांना प्रतिफॉर्म ५० रुपये देण्याचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे. यावर जर सेतू केंद्राने पैसे घेतले तर त्यांचं सेतू केंद्र रद्द करण्यात येईल. लाडकी बहिण योजना पारदर्शकपणे राबण्याचा आमचा हेतू आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते विधानसभेत बोलत होते.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्य सरकारने अनेक चांगल्या योजनांची घोषणा केली आहे. माझी लाडकी बहिण ही अत्यंत महत्वकांक्षी योजना महाराष्ट्र सरकारने घोषित केली आहे. या योजनेमध्ये काल काही बदल करण्यात आले आहेत. २१ वर्षांपासून ६५ वर्षांपर्यंत ज्या महिलांचे उत्पन्न अडीच लाख रुपयांच्या आतमध्ये आहे. त्यांना १५०० रुपये महिन्याला देण्याचा निर्णय घेण्यात आलाय, असेही फडणवीस यांनी सांगितले.

पाच एकर जमिनीबाबतची अट होती, ती आम्ही काढून टाकली

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, पाच एकर जमिनीबाबतची अट होती, ती आम्ही काढून टाकली आहे. शिवाय १५ दिवस नाही, तर अर्ज भरण्यासाठी ६० दिवसांची मुदत आपण दिली आहे. ६० दिवसांमध्ये जे अर्ज करतील, त्यांनी १ जुलैला अर्ज केलाय, असं समजून दोन्ही महिन्यांचे पेमेंट मिळेल. ऑगस्टनंतर जे अर्ज करतील त्यांना त्या दिनांकापासूनचे पेमेंट मिळेल, असा निर्णय घेण्यात आलाय.

डोमेसाईलचा दाखल्याचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, त्याला आम्ही नवऱ्याचा जन्म दाखला किंवा रेशनकार्ड असे पर्याय दिले आहेत. शिवाय मतदार यादीतील नाव असेल तरी तो डोमेसाईलला पर्याय असणार आहे. त्यामुळे आता रांगांमध्ये उभे राहण्याची गरज नाही, असा विश्वासही देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

# सागरी सुरक्षिततेसाठी कंत्राटी पोलीस भरती

**मुंबई :** सागरी सुरक्षिततेसाठी ११ महिन्यांकरिता कंत्राटी पोलीस भरती केली जाणार आहे. भारतीय तटरक्षक दलातून सेवानिवृत्त झालेल्यांना अटी व शर्तीवर सेवेत सामावून घेतले जात आहे. कोणत्याही अंमलदारांच्या पदोन्नतीवर त्याचा परिणाम होणार नाही. त्याचबरोबर कोळी बांधव आणि स्थानिकांना सागरी सुरक्षा दलात प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

राज्यातील पोलीस दलात केली जाणारी कंत्राटी कर्मचारी भरतीमुळे सागरी सुरक्षेला धोका निर्माण होईल. तातडीने ही भरती प्रक्रिया रद्द करावी, अशी मागणी आमदार रमेश पाटील यांनी प्रश्नोत्तराच्या तासाला केली. आमदार प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, ड.अनिल परब यांनी चर्चेत भाग घेतला. गृहमंत्र्यांनी यावर उत्तर देताना, राज्यात नियमित भरती प्रक्रिया राबवली जात आहे. उर्वरित रिक्त पदे लवकरच भरली जातील. राज्य पोलीस दलात सागरी सुरक्षिततेसाठी असलेली पदे ही तांत्रिक स्वरूपाची आहेत. सरळसेवा कोट्यातील एकूण १६२ रिक्त पदांपैकी ५० टक्के म्हणजेच ८१ रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. रोस्टर तपासणी नंतर इतरही पदे भरली जातील. सागरी सुरक्षेसाठी वेगवान बोटी चालविण्याकरिता पोलीस उप निरीक्षक (सेकंड क्लास मास्टर) गट-ब (अराजपत्रित) आणि पोलीस उप निरीक्षक (फर्स्ट क्लास इंजिन ड्रायव्हर) गट-ब (अराजपत्रित) ही तांत्रिक पदे महत्वाची आहेत. या पदांचे महत्व लक्षात घेऊन ती भरली जाईपर्यंत भारतीय नौदल, भारतीय तटरक्षक दल या विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांची ११ महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने भरती केली आहे. अटी व शर्ती त्यांना लागू केल्या आहेत. कोणत्याही अंमलदारांच्या पदोन्नतीवर विपरित परिणाम होणार नाही. याशिवाय, स्थानिक कोळीबांधवाना प्राधान्य देण्यावर शासनाचा भर असेल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

